संगीत आणि भारतीय समाज

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# ३६. संगीत आणि भारतीय समाज

डॉ. वैशाली देशमुख
विभाग प्रमुख (संगीत), शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

सर्व ललीत कलांमध्ये संगीत ही कला श्रेष्ठ मानली जाते कारण ही एकमेव कला अशी आहे, जी मानवाच्या मनामध्ये चैतन्यस्वरूपात अस्तित्त्वात असलेली दिसून येते. ज्या कलेत स्वर आणि लय या मुलभूत घटकांव्दारे एक अलौकिक भावविश्व अथवा रसोत्पत्ती निर्माण केली जाते. मनुष्य जन्माला आला आणि सोबत संगीतही घेवून आला असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. म्हणूनच मनुष्याची सांगीतिक प्रकृती ही एक सहजप्रवृत्ती आहे.

संगीत ही एक मानसिक गरज आहे. Music is a psychological हा् वैदिक संस्कृतीत असे म्हटले जाते की, नाद हेच सर्व सृष्टीचे अंतिम तत्व आहे आणि संगीत हे त्याचे वाद्यरूप आहे. नाद तत्त्वापासूनच सर्व सृष्टी उत्पन्न झाली आहे.

आजपर्यंतच्या इतिहासावरून हे स्पष्ट दिसते की, प्रत्येक काळात संगीताला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. संगीत अनादी व स्वयंभू आहे. वैदिक युगापासून विकसित होत गेलेल्या संगीताचे भारतीय समाज जीवनात अतिशय महत्त्व आहे.

कोणतीही कला ही विकसनशील असते आणि कलेचा विकास काळानुरूप बदलणाऱ्या सामाजिक स्थितीवर अवलंबुन असतो. भारतीय संगीतकला ही या देशातील अत्यंत प्राचीन कालांपैकी एक मानली जाते व या कलेचा उगम जवळ जवळ ५००० वर्षापूर्वीचा आहे असे काळाच्या इतिहासात लिहील्या गेलेल्या अनेक ग्रंथांमधुन उल्लेखिले आहे.

वैदिक काळातील ऋचा गायनामध्ये संगीताचे स्वरूप दिसून येते. रामायण, महाभारत काळातही संगीताचे असलेले स्थान आपल्याला सर्वश्रृत आहे. दहाव्या शतकात भारतावर मुघलांचे आक्रमण झाले व सामाजिक परिस्थिती बदलली आणि त्याचा परीणाम संगीतावर झाला. परंतु संगीताचे समाजातील स्थान कायम राहीले.

वैदिक काळातील संगीत मुघलकाळात राजदरबारात बंदिस्त झाले व राजाश्रयावर संगीताची विकासवृत्ती जोपासली गेली, राजघराण्याच्या स्त्रीया देखील संगीतकला शिकु लागल्या आणि त्यामुळे संगीताच्या माध्यमातून कलाकारांचा उदनिर्वाह होवू लागला परंतु या काळात संगीताकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोण थोडा बदलुन ही कला विलासवृत्तीची आहे असे समजले गेले व कुलीन स्त्रीयांना संगीत कला शिकण्याची परवानगी दिली जात नसे.

प्राचिन काळापासून ते विसाव्या शतकापर्यंत भारतात अनेक परीवर्तने झालीत परकीयांची भारतावर अनेक आक्रमणे झाली. या सर्वांचा परीणाम समाजावर झाला आणि त्याच बरोबर संगीतकलेवरही झाला. राजा कालस्य कारणम् या म्हणीनूसार सत्तेवर असलेल्या राजाच्या आचार - विचारांचे अनुकरण तेथील जनतेने स्वीकारले. मुसलमानी कालखंडात अरबी व पर्शियन संगीताचा संस्कार भारतीय संगीतावर झाला व नंतर भारतीय संगितात विविध गीतप्रकार उद्यास आलेत. या गीतप्रकारांना समाजात मान्यता मिळाली व आजही हे गीतप्रकार भारतीय संगीतात रूढ आहेत. अनेक आक्रमणांनतर भारताला स्वातंत्र्य

Govt. College of Arts & Science Aurangabad



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

मिळाले आणि भारतीय समाज देखील स्वतंत्र झाला आणि अर्थातच राजदरबारातील संगीत हे सर्वसामान्यांसाठी उपलब्ध झाले. आणि यानंतरच पुन्हा एकदा भारतीय संगीतात बदल घडुन आला. समाजाच्या संगीतकलेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत गेला. स्त्रीयांना संगीतकला शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जावू लागले आणि यातुनच अनेक गायीकांची निर्मिती झाली ज्यांनी आपल्या गाण्यातून मनोरंजन आणि समाज प्रबोधन देखील केले.

कला ही परीवर्तनशील असल्यामुळेच तिचा विकास होत जातो आणि आजही भारतीय संगीताची स्थिती ही नक्कीच विकसनशील स्वरूपात आहे.

मानवी मन हे समाजाच्या बदलाचे मुख्य कारण असु शकते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ह्दयाची धडधड हा इश्वरनिर्मित ताल असुन तो वाजण्याचा थांबला की जीवनाची समाप्ती होते. निसर्गात ओढे नाल्याची खळखळ, पक्षांची किलबिल, कोकीळेचा कुहुकुहु आवाज, समुद्राची मंद्रात घुमणारी गाज, मोराचा केकरव, पानांची सळसळ, ढगांचा घनगंभीर गडगडाट, रानकिड्यांची तालबद्ध किरकिर, बेडकांचा डराव-डराव आवाज ही चैतन्याची कींवा संगीताची ठळक उदाहरणे निसर्गात सापडतात. माणसाच्या जीवनातील प्रत्येक वळणावर संगीताचे स्थान महत्त्वाचे आहे. मानवी आणि समाज या दोन गोष्टी एकमेकांवर आधारीत आहे. त्यामुळे सामाजिक जीवनात संगीताचे स्थान अटळ आहे.

समाजमनांचे परीवर्तन करण्याची ताकद संगीत कलेत आहेत. विविध युगामधील संगीताचे विकसित रूप बघितल्यास त्यामध्ये त्या युगातील समाजमनाचे अस्तित्त्व दिसून येते संगीतकला ही प्रत्यक्ष जीवनातील अनेकविध अनुभूतींची अभिव्यक्ती असते.

संगीतकलेचा आणि समाजाचा अतिशय जवळचा संबंध आहे. समाजावरच ही कला पूर्णपणे अवलंबुन आहे. पुर्वीपासून म्हणजेच वैदिक युगापासुन समाजात रूढ असलेले हे संगीत काहीकाळ बंदिस्त असतांना परत समाजातच रूढ झाले आणि समाज नावाच्या मंदिराच्या कळसावर बसले आहे असे म्हणावे लागेल.

**संदर्भग्रंथ**

१. संगीतशास्त्र विज्ञान - डॉ. सुचेता बिडकर
२. संगीत निबंधावली - किरण फाटक
३. हिंदुस्थानी संगीत पध्दत्ती - डॉ. बाळ पुरोहीत
४. सारेगमपधनि - डॉ. मोहना मार्डीकर
५. हिंदुस्थानी संगीत - अशोक रानडे
६. संगीत कला आणि शिक्षण - पं. सुधीर माईणकर

Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad